तरुण भारत

शुक्रवार, १९ फेब्रुवारी २०१६

# हळबे महाविद्यालयात हस्तकला प्रदर्शन

प्रतिनिधी
दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे कौशल्य निर्माण व्हावे व त्यांच्या कलेला व्यासपीठ मिळावे या हेतूने विद्यार्थ्यांच्या हस्तकलेतून साकारलेल्या वस्तूचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शनात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व हस्तकलेतून साकारलेल्या लाकडी, कापडी, काचेच्या, मातीच्या, प्लास्टीकच्या उपयोगी व शोभेच्या वस्तू प्रदर्शनात मांडल्या.

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन नगराध्यक्ष संतोष नानचे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रदर्शनासाठी आपल्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा. पी. एन. ढेपे, प्रा. दिलीप बर्वे, डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, प्रा. एस. एन. जाधव, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. एस. एस. पाडगावकर उपस्थित होते.

स्पर्धेत तेजस्वी माणगावकर हिने प्रथम, रुची नेवरेकर हिने द्वितीय तर निकिता गवस हिने तृतीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ बक्षीस राजाराम गवस याला देण्यात आला. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. एस. यु. दरेकर व प्रा. एस. एन. जाधव यांनी काम पाहिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पी. एन. ढेपे व प्रा. एस. एस. पाडगावकर यांनी परीश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. ढेपे यांनी केले.